॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ६ ( ) अणुशास्त्रज्ञ डॉ.अनिल काकोडकर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त १४ जुलै रोजी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि मराठी विज्ञान परिषद, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या आधारे संपत्तीनिर्मिती या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे.

जगातील श्रीमंत राष्ट्रांकडे नजर टाकली तर त्या देशाची सुबत्ता ही विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगती, त्यातील संशोधन, नाविन्यपूर्ण संकल्पनांच्या आधारावर निर्माण झालेली तंत्रशास्त्रे आणि समाजाचा वैज्ञानिक दृष्टीकोन या आधारावर झाली आहे. भारतात सुबत्ता हवी असेल तर व सर्वसामान्यांचे जीवनमान सुधारायचे असेल तर विज्ञान-तंत्रज्ञान हाच मार्ग असू शकतो. त्यासाठी आवश्यक ती बुध्दीमत्ता आहे. उच्च दर्जाचे संशोधन कौशल्ये आहे, चांगल्या प्रयोगशाळा आहेत, विद्यापीठे आहेत. परंतू विज्ञान-तंत्रज्ञानाच्या आधारे संपत्तीनिर्माण करण्यातले आपले यश मर्यादित आहे. याचे कारण इथल्या विज्ञान संशोधनाची नाळ समाजाशी जुळली नाही. संशोधनाचे घेतलेले प्रश्न वेगळे आणि समाजाचे प्रश्न वेगळे त्यामुळे संपत्तीनिर्माण होणार कशी ? अश परिस्थितीत काही यशोगाथा आणि समाजपयोगी तंत्रज्ञान निर्माण करणारे संशोधक यांचे अनुभव विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधकांपर्यंत पोहचावेत या हेतुने हा परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे.

शाश्वत शेती, पाण्याची साठवण, घनकचना व्यवस्थापन या व अशा सारख्या अन्य विषयांवर हा परिसंवाद होणार आहे. डॉ.काकोडकर यांच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्ये साधून या कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्राच्या विविध भागात करावयाचे मराठी विज्ञान परिषदेने ठरविले आहे. त्यादृष्टीने १४ जुलै रोजी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात होणाऱ्या या परिसंवादात डॉ.गजानन डांगे (योजक संस्था, नंदुरबार), प्रा.मिलिंद सोहोनी (आयआयटी, मुंबई), डॉ.विवेक सावंत (एमकेसीएल, पुणे), डॉ.गिरीश सोहनी (बीएआयएफ, पुणे), प्रा.जे.बी.जोशी (अध्यक्ष, मराठी विज्ञान परिषद, मुंबई) आणि डॉ.अनिल काकोडकर (राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, मुंबई) यांची भाषणे होणार असून कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांचे अध्यक्षीय भाषण होणार आहे.

विद्यापीठ आणि महाविद्यालयात संशोधन करणारे विद्यार्थी, प्राध्यापक, शेतकरी तसेच नवे तंत्रज्ञान समाजात रुजवण्यासाठी प्रयत्न करणारे अन्य भागधारक यांनी या परिसंवादात सहभागी व्हावे व त्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर १० जुलै पर्यंत नोंदणी करावी असे आवाहन परिसंवादाच्या संयोजन समितीने केले आहे. हा परिसंवाद विनाशुल्क आहे.

---

जा.क्र . : उमवि/१६/हस्तदेय /२०१८ — दिनांक : ०६ जुलै, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून सर्व आवृत्त्यांमध्ये प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle
North Maharashtra University, Jalgaon
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

**बातमी क्र. १**

जळगाव दि.६ (        ) राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे संसदीय कार्यप्रणाली आणि प्रथा या विषयावर नागपूर येथील पावसाळी अधिवेशनात होणाऱ्या अभ्यास वर्गासाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे सहा विद्यार्थी रवाना झाले.

राज्यशास्त्र व लोकप्रशासन या विषयातील पदव्युत्तर विद्यार्थी व अधिव्याख्यात्यांसाठी हा अभ्यास वर्ग नागपूर येथे होत आहे. पूजा सोनवणे (उमवि), भूषण धनगर (मु.जे.महाविद्यालय, जळगाव), पूजा सुर्यवंशी (प्रताप महाविद्यालय, अमळनेर), प्रिती राजपूत (बीपी महाविद्यालय, चाळीसगाव), कल्याणी पाटील (एसएसव्हीपीएस, महाविद्यालय, धुळे), जितेंद्र आपटे (विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे) हे विद्यार्थी रवाना झाले असून संघव्यवस्थापक म्हणून प्रा.विजय सुर्यवंशी (जिजामाता महाविद्यालय, नंदुरबार) हे त्यांच्या सोबत आहेत. प्र-कुलगुरु प्रा.पी.पी. माहुलीकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा.एस.टी.इंगळे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि.६ (        ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील जनसंवाद आणि पत्रकारिता विभागात एम.ए.(एम.सी.जे.) अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी प्रवेश पूर्व परीक्षा दि.१४ जुलै, २०१८ रोजी होणार आहे.

यु.जी.सी. पॅटर्ननुसार पत्रकारिता आणि जनसंवाद अभ्यासक्रमांची पुर्नरचना व रोजगाराभिमुख व कौशल्यावर आधारित करण्यात आला आहे. इलेक्ट्रॉनिक, मिडिया, जनसंपर्क, जाहिरात न्यू मिडिया क्षेत्रात करिअर करु इच्छिणाऱ्या युवकांना सुवर्ण संधी उपलब्ध आहे. सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी कोणत्याही विद्याशाखेचा पदवीधर या अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ शकतो. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी दि.१२ जुलै, २०१८ पर्यंत पत्रकारिता विभागात नाव नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर संपर्क साधावा असे आवाहन विभागप्रमुख डॉ.तुकाराम दौड व डॉ.सुधीर भटकर यांनी केले आहे.

---

**बातमी क्र.३**

जळगाव दि.६ (        ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिसरात कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्यासह प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी शुक्रवार, दि.५ जुलै रोजी १०५० वृक्षांचे रोपण केले.

..२..

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग



महाराष्ट्र शासनाने वृक्ष लागवडीचा महत्वाकांक्षी धडक कार्यक्रम हाती घेतला आहे. यात उच्च व तंत्रशिक्षण विभागासह इतर शासकीय विभाग सहभागी आहेत. महसूल व वन विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांनी दिलेल्या निर्देशानुसार विद्यापीठाने पुढाकार घेत शुक्रवारी मोठया प्रमाणात वृक्षारोपण केले.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत गांधी टेकडी परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. याशिवाय मुख्य प्रवेशद्वार ते क्रीडा संकुल या मार्गावर देखील प्राध्यापक, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वृक्षारोपण केले. १०५० झाडे यावेळी दिवसभरात लावण्यात आली. यामध्ये पेरु, चिंच, शिसम, जांभूळ, कडूनिंब, करंज, सिताफळ, आवळा,गुलमोहर, बेल, शिसम या झाडांचा समावेश आहे. वन विभाग जळगाव यांनी हे वृक्ष पुरवले.

या कार्यक्रमात वित्त व लेखाधिकारी डॉ.बी.डी.कऱ्हाड, प्रा.एस.टी.इंगळे, प्रा.डी.के.गौतम, प्रा.डी.एच.मोरे, प्रा.आर.पी.गोरे, प्रा.दिपीक दलाल, विद्यापीठ उप अभियंता राजेश पाटील तसेच विविध प्रशाळांचे संचालक, प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. उद्यान विभागाचे प्रभारी पी.टी.मराठे, पांडूरंग जमाले, चिंतामण सोनवणे यांनी या वृक्षारोपणासाठी सहकार्य केले.

---

**बातमी क्र.४**

जळगाव दि.६ ( ) :- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षातंर्गत वेबदुनिया डॉट कॉम या नामांकीत कंपनीतर्फे दि. १० जुलै, २०१८ रोजी सकळी १० वाजता खुल्या परिसर मुलाखतीचे आयोजन करण्यात आले आहे.

पदवीधर, पदव्युत्तर पदवी असणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता या परिसर मुलाखतीचे आयोजन करण्यात आले आहे. यासंदर्भातील सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. इच्छुक व पात्रता धारक विद्यार्थ्यांनी http://www.nmu.ac.in./tpcell/enus/tpchome.aspx या संकेतस्थळावर प्रथम नोंदणी करावी आणि दि. १० जुलै रोजी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे आवाहन केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाच्या अधिकारी कविता मंडोरे यांनी केले आहे.

---

जा.क्र . : उमवि/१६/हस्तदेय /२०१८ — दिनांक : ०६ जुलै, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून सर्व आवृत्त्यांमध्ये प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
जनसंपर्क अधिकारी
यांच्या करिता